# नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रधानमंत्री आवास योजना कार्यालय,
महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर ४४० ००१

## जाहीर सूचना

**प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० AHP अंतर्गत नागपूर शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) नागरीकांकरिता उत्तर नागपूर क्षेत्रातील मौजा- नारी, येथे १ BHK (३२.५५ चौ. मी. / ३५०.३७ चौ. फूट, चटई क्षेत्रफळ) आणि २ BHK (४५.०० चौ. मी. / ४८४.३८ चौ. फुट. चटई क्षेत्रफळ) चे एकूण ५१८ सदनिकांच्या विक्रीसाठी नागपूर महानगरपालिकाव्दारे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत असून गरजू नागरीकांकडून ऑनलाईन अर्ज मनपाचे https://www.nmcnagpur.gov.in/ या संकेत स्थळावर मागविण्यात येत आहे.**

# नागपूर महानगरपालिका

घेऊन आले आहे प्रधानमंत्री आवास योजना २.0 अंतर्गत
न भूतो न भविष्यती अशी १ आणि २ BHK घरकुल योजना

# स्वप्नपूर्ती

ख.क्र. ९६ / ४, मौजा - नारी, नागपूर येथे आपल्या हक्काच्या घराच स्वप्नं पूर्ण करण्याची सुवर्ण संधी.



## अर्जाची नोंदणी व स्विकृतीचे वेळापत्रक :

१) अर्ज नोंदणी कालावधी जाहिरात दिनांक २४/०२/२०२६ दुपारी ३:०० वाजेपासून दिनांक ३१/०३/२०२६ रात्री १२:०० वाजेपर्यंत.

२) सोडतीचा दिनांक व स्थळ मनपा ठरवेल त्याप्रमाणे.

३) अर्जाची किंमत १ BHK रु. ३,०००/- आणि २ BHK रु. ५,०००/- (ना परतावा) ऑनलाईन जमा करावे लागेल.

४) सदनिकांचे वाटप ऑनलाईन संगणकीय सोडत पध्दतीने करण्यात येईल.

५) वाटपाचे अटी व शर्ती तसेच अर्ज भरण्याची आवश्यक माहिती ही नागपूर महानगरपालिकेच्या https://www.nmcnagpur.gov.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच कुठलाही वाद उदभवल्यास मा. आयुक्त महोदयांनी दिलेले आदेश तसेच ऑनलाईन संकेत स्थळावरील माहिती अंतिम म्हणून ग्राहय धरली जाईल.

स्थानासाठी स्कॅन करा

## आरक्षित सदनिकेचा तपशील :

| आरक्षण तक्ता | प्रकार | अराखीव ५० % | अ. जा. १३% | अ. ज. ७% | इ. मा. व. ३०% | एकूण | दिव्यांग प्रवर्ग करिता समांतर आरक्षण ५% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ BHK | १०५ | २७ | १५ | ६३ | २१० | १० |
| | २ BHK | १५४ | ४० | २२ | ९२ | ३०८ | १६ |

## सदनिका विक्री राशीचे तपशील :

| सदनिका बांधकाम जमिनीचे तपशील | एकूण उपलब्ध सदनिका | सदनिकेची अंदाजे किंमत रु. | शासनातर्फे मिळणारे अनुदान रु. | सदनिकेचे अंदाजे विक्री मूल्य रु. | सदनिकांचे अंदाजित बांधीव क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|
| खसरा क्र.९६ / ४, मौजा - नारी, नागपूर | १ BHK चे २१० | रु. १५,५१,६७२/- | रु. २,५०,०००/- | रु. १३,०१,६७२/- | ४४.४६ चौ. मी. / ४७८.३८ चौ. फुट. |
| | २ BHK चे ३०८ | रु. २१,०१,७४८/- | रु. २,५०,०००/- | रु. १८,५१,७४८/- | ५८.५५ चौ. मी. / ६१९.२३ चौ. फुट. |

**टिप:** सदनिका वाटप झालेल्या नागरीकांना सदनिका विक्री किंमत व्यतिरिक्त खालील प्रमाणे अतिरिक्त शुल्क सदनिका विक्री किमतीच्या राशीवर विभागात जमा करावा लागेल.

| सदनिका | मुद्रांक शुल्क | रजिस्ट्रेशन शुल्क १% | मेट्रो सेस १% | ULB सेस १% | GST १% | सोसाईटी डिपॉझीट | Legal शुल्क | इलेक्ट्रिक मीटर करिता | असे एकूण अंदाजे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ BHK | रु. १,०००/- | रु. १५,५१७ | रु. १५,५१७ | रु. १५,५१७ | रु. १५,५१७ | रु. ५,०००/- | रू. १०,०००/- | रु. ५,०००/- | रु. ८३,०६८/- |
| २ BHK | रु. १,०००/- | रु. २१,०१८ | रु. २१,०१८ | रु. २१,०१८ | रु. २१,०१८ | रु. ७,०००/- | रू. १०,०००/- | रु. ५,०००/- | रु. १,०७,०७२/- |

तसेच महसूल व वन विभागाचे शा. नि. नुसार नोंदणी व मुद्रांक विभागातील दस्त हाताळणी शुल्क रु. ४०/- प्रति पान प्रमाणे अतिरिक्त शुल्क अंदाजे रु. ४,०००/- या कार्यालयास जमा करावे लागेल.

## अर्जदाराची पात्रता निकष/ अर्ज कोण करू शकतो :

१) अर्जदार नागपूर महानगरपालिका हद्दीतील रहीवासी असावा (२) अर्जदार तथा त्यांच्या कुटूंबाच्या नावे देशात कुठेही पक्के घर नसावे (३) शासनाचे शासन निर्णयानुसार अर्जदार तथा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ३.०० लक्ष पेक्षा अधिक नसावे.

## सोई व सुविधा :

(१) प्रकल्पामध्ये बाग बगिचे, कम्युनिटी हॉल इत्यादी (२) पर्जन्य जलसिंचन प्रकल्पाची सुविधा (Rain Water Harvesting)
(३) जलनि: स्सारण प्रकल्पाची सुविधा (Sewage Treatment Plant). ४) पायाभूत सुविधा.

## अर्ज करतेवेळी सोबत बाळगावयाची आवश्यक कागदपत्रे :

(१) कुटुंबातील व्यक्तीचे आधार कार्ड, (२) रेशनकार्ड, पैन कार्ड, मतदान कार्ड इ. पैकी कोणतेही एक (प्रत्येक व्यक्ती करीता) (३) बैंक पासबुक (४) दिव्यांग प्रमाणपत्र (असल्यास) (५) मोबाईल क्र. (६) अर्जाचे शुल्क रु. ३,०००/- व रु. ५,०००/- (ना-परतावा).

## अटी व शर्ती :

१) एका व्यक्तीस किंवा कुटुंबास एकच सदनिका करिता अर्ज दाखल करता येईल. (२) वाटप करण्यात येणारी सदनिका ही कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर करण्यात येईल आणि कर्ता महिला सदस्य नसेल त्या ठिकाणी कर्ता पुरुषांच्या नावे करण्यात येईल (३) कुटुंबाची व्याख्या पती, पत्नी व त्यांचे अविवाहीत (Children) मुले. (४) प्रधानमंत्री आवास योजनेतील विहीत शर्ती व अटीच्या अधीन राहून सदर्हू योजनेतील सदनिकांचे वाटप ऑनलाईन संगणकीय सोडत पध्दतीने करण्यात येईल. याबाबत अर्जदाराचा कोणताही आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. (५) एकाच कुटुंबास एक पेक्षा अधिक सदनिका ऑनलाईन संगणकीय सोडत पध्दतीने वाटप झाल्यास प्रथम गाळयास प्राधान्य देवून उर्वरीत अधिकचे गाळे रद्द करण्यात येतील. (६) सोडतीत लाभार्थ्यांना वाटप झालेली सदनिका बदलून मिळणार नाही. (७) लॉटरी पध्दतीने सदनिकांचे वाटप झाल्यावरती लाभार्थीला ५% राशी booking amount म्हणून एक महिण्याच्या कालवधीत भरावे लागेल. (८) वरील योजना रेरा नोंदणीकृत करण्यात येईल. (९) उर्वरीत रक्कमेचा तपशील (Schedule of payment) रेरा ॲक्ट नुसार बांधकाम टप्प्यानुसार घेण्यात येईल. (१०) ऑनलाईन संगणकीय सोडत पध्दतीने सदनिकांचे वाटप झालेल्या लाभार्थ्यांना उर्वरीत रकमेचा भरणा करण्यास बैंकमार्फत कर्ज घेण्याची कार्यवाही बुकींग राशीचे जमा केल्यापासून एक महिण्यांच्या आत पूर्ण करावे लागेल. (११) वाटप झालेल्या लाभार्थ्यांना रु. ७००/- व १,०००/- प्रती महीना देखभाल व दुरुस्ती शुल्क गृहनिर्माण संस्थेला व मनपाला जमा करावे लागेल. (१२) अर्जदाराने कोणत्याही टप्प्यावर अर्ज रद्द केल्यास रेरा ॲक्ट नुसार २% राशी बुकींग राशीचे शुल्कातुन कपात करून उर्वरीत राशी अर्जदाराच्या बैंक खात्यामध्ये वळती करण्यात येईल. (१३) प्रधानमंत्री आवास योजना www.pmaymis.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी केल्याशिवाय रु. २.५० लक्ष अनुदान मिळणार नाही, यांची अर्जदाराने नोंद घ्यावी. (१४) वरील अटी शर्तीचे पालन अर्जदाराने न केल्यास कोणत्याही टप्प्यावर अर्ज रद्द करण्यात येईल व त्यास अर्जदार स्वतः जबाबदार असेल. (१५) वरील योज ने मधील अटी व शर्ती मध्ये कोणत्याही प्रकाराचे बदल मा. आयुक्त महोदय कोणत्याही टप्प्यावर करू शकतील व त्यास अर्जदारांचे आक्षेप ग्राहय राहणार नाही याची अर्जदाराने नोंद घ्यावी.

## सतत उदभवणारे प्रश्न :

**१) योजनेच्या लाभासाठी अर्ज कसा करावा?** अर्जदार खाजगी इंटरनेट कॅफेवर किंवा स्वतः चे मोबाईल तथा संगणकावर ऑनलाईन अर्ज http://www.nmcnagpur.gov.in/; या संकेतस्थळावर करू शकतो तसेच मनपा अतंर्गत सर्व नागरी सुविधा केंद्रांवर (CFC) ऑनलाईन अर्ज भरण्याची सोय उपलब्ध केलेली आहे.

**२) माझ्याकडे आधारकार्ड नाही, मी अर्ज करू शकतो का?** कोणत्याही नागरीकांना प्र. आ. यो. अंतर्गत अर्ज करण्यासाठी आधार क्रमांक अनिवार्य आहे. कृपया आपले आधार कार्ड जवळच्या नागरी सुविधा केंद्राकडुन तयार करावे, जवळचे नागरी सुविधा केंद्र आपणाला http://www.apnacsonline.in/csc-locator/ या संकेत स्थळावर पाहता येईल.

**३) अधिक माहितीसाठी मी कोणाशी संपर्क साधावा?** अर्ज नोंदणी करिता येणाऱ्या अडचणी किंवा अधिक माहिती करिता दूरध्वणी क्रमांक ८८५५८ ८८३७४, ८८५५८ ८८५७४, ८९५६६ ५२१७० यावर कार्यालयीन दिवशी सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत तसेच मनपा मुख्यालय, सिवील लाईन्स या कार्यालयात कार्यालयीन वेळेत संर्पक साधावा.

Sandeep Dwellers Pvt. Ltd.
www.sandeepdwellers.com

प्रोजेक्ट डेव्हलपर-
संदिप ड्वेलर्स प्रा. लि.

Project Management Consultant
archinova design inc.
Delivering Ingenuity
•Architect •PMC •Govt. Regd. Valuers.
ISO 9001 : 2015 Quality Management System

वित्तीय सहाय्य

Union Bank · BOI Bank of India · सेंट्रल बैंक ऑफ इंडिया Central Bank of India · YES BANK · AXIS BANK · Bank of Baroda · केनरा बैंक Canara Bank · HDFC HOME LOANS · pnb · SBI · equitas · hffc · Mahindra HOME FINANCE · Svatantra · IIFL FINANCE